# विद्युत शुल्क शाखेचे कार्य

## १. नियमित कामकाज :

महाराष्ट्र विद्युत शुल्क कायदा, २०१६ व महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर कायदा, १९६३ नुसार मुख्य विद्युत निरीक्षक ह्यांना “अधिकारी” म्हणून प्राधिकृत केले आहे. विद्युत शुल्क व विद्युत विक्री कर संबंधित निरीक्षणाचे काम उपसंचालक, लेखा व लेखा परीक्षण, अधीक्षक अभियंता / विद्युत निरीक्षक, विद्युत कर निरीक्षक यांच्या सहायाने पार पाडले जाते. उपरोक्त कायद्यानुसार शासनास देय असलेली रक्कम पडताळण्यासाठी परवानाधारक व खाजगी वीज उत्पादकांची लेखा पुस्तके व अभिलेख अधिकाऱ्यांतर्फे तपासले जातात.

महाराष्ट्र विद्युत शुल्क कायदा, २०१६ व महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर कायदा, १९६३ या कायद्यातील तरतुदी व नियम यांचे अंमलबजावणी करिता विजकर निरीक्षक सहाय्य करतात.

## २. विद्युत शुल्क :

महाराष्ट्र विद्युत शुल्क कायदा 2016 चे नियम क्रमांक ३(१) मधील तरतुदीनुसार विविध वीज ग्राहकाच्या विजेच्या वापरानुसार विद्युत शुल्क आकारले जाते. महाराष्ट्र वीज नियामक मंडळाने वीज ग्राहकाच्या वीज वापरानुसार विहित केलेल्या वर्गीकरणानुसार वीज शुल्क आकारल्या जाते. ह्या वर्गीकरणामध्ये विविध वर्गवारी पुढीलप्रमाणे आहेत- घरगुती, बिगर घरगुती, औद्योगिक, शेतकी, तात्पुरते, जाहिरात/होर्डिंग, मोनो/मेट्रो रेल, ओपन ॲसेस, जनरेटर इत्यादी. प्रत्येक वर्गवारीकरिता विद्युत शुल्क दर हा वेगळा आकारला जातो.

## ३. विजेच्या विक्रीवरील कर :

महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर कायदा, १९६३ चे नियम क्रमांक ३ नुसार परवानाधारक वीज ग्राहकाच्या वीज युनिटच्या वापरानुसार विजेच्या विक्रीवरील कर आकारतात. महारष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, टाटा पॉवर कंपनी, बेस्ट,रिलायंस इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी हे परवानाधारक महाराष्ट्र शासनास विजेच्या विक्रीवरील कर अदा / जमा करतात.

## ४. विजेचा कर जमा करण्याची विद्यमान पद्धत :

महाराष्ट्र विद्युत शुल्क कायदा 2016 चे कलम ६ तरतुदीनुसार, प्रत्येक परवानाधारकाने योग्य प्रमाणात विद्युत शुल्क आकारून राज्य शासनास अदा करायाचे आहे. महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर कायदा, १९६३ चे नियम क्रमांक ४ तरतुदीनुसार प्रत्येक परवानाधारकाने योग्य प्रमाणात विजेच्या विक्रीवरील कर आकारून राज्य

शासनास अदा करायाचे आहे. जे ग्राहक / व्यक्ती स्वतः विजेची निर्मिती करून त्याचा वापर स्वतःचे कामाकरिता करतात त्यांनी ग्रास प्रणालीद्वारे विद्युत शुल्क महाराष्ट्र शासनास अदा करायचा आहे.

### ५. विद्युत शुल्क सुट व परताव्याची कार्यपद्धती :

परिस्थिती नुसार राज्य शासन विशिष्ट वर्गाच्या ग्राहकाकरिता राज्याच्या कोणत्याही भागात किंवा विविध धोरणांतर्गत विद्युत शुल्क सुट लागू करू शकते. संबंधित ग्राहक / व्यक्ती जिल्हयाच्या विद्युत निरीक्षकाकडे विहित रीतीने विद्युत शुल्क सूटच्या मंजुरीकरिता अर्ज करू शकतो. जर समुचित ग्राहकाबाबतचा प्रस्ताव योग्य आढळल्यास मुख्य विद्युत निरीक्षक / विद्युत निरीक्षक प्रकरण अन्वये सदर ग्राहकाला पात्रता प्रमाणपत्र जारी करतील. संबंधित ग्राहक सदर पात्रता प्रमाणपत्र परवानाधारकाच्या संबंधित कार्यालयात सादर करतील. त्यानंतर शासन निर्णयानुसार परवानाधारकाकडून ग्राहकाच्या पुढील बिलिंग सायकल मध्ये वीज दरात सवलत देण्यात येईल.

विद्युत शुल्क हे अगोदरच अदा केले असल्याच्या परतावा प्रकरणात, संबंधी ग्राहक / व्यक्ती हे परवानाधारकाच्या कार्यालयात विहित रीतीने अर्ज करू शकतो. सदर अर्ज पडताळणी केल्यानंतर परवानाधारक संबंधित जिल्हयाच्या विद्युत निरीक्षकाकडे मंजुरी करिता पाठवू शकतात. जर समुचित ग्राहकाबाबतचा प्रस्ताव योग्य आढळल्यास मुख्य विद्युत निरीक्षक / विद्युत निरीक्षक प्रकरण अन्वये सदर ग्राहकाला पात्रता प्रमाणपत्र जारी करतील. मंजुरी नंतर अदा केलेले विद्युत शुल्क हे संबंधित ग्राहक / व्यक्ती यास परत करण्यात येते.

### ६. महाराष्ट्र विद्युत शुल्क नियम, १९६२ नुसार जनित्र संच मांडणीची नोंदणी :

केंद्रीय विद्युत प्राधिकरण विनियम, 2023 चे विनियम 34 नुसार २०० कि.वॅट वरील जनित्र संचमांडणीचे निरीक्षण विद्युत निरीक्षकाकडून केले जाते व समुचित अधिकाऱ्याकडून त्याची नोंदणी केल्या जाते.

**Functions of Electricity Duty Wing**

1. **Routine functioning:**

The Chief Electrical Inspector is designated as the authority as per Maharashtra Electricity Duty Act 2016 and Maharashtra Tax on Sale of Electricity (ToSE) Act 1963. The Electricity Duty and TOSE is monitored by the Dy.Director, Accounts & Audit, Superintending Engineer/ Electrical Inspectors and Duty Inspectors. The books and records of licensees and private electricity producers / users are inspected by the officers to verify the amount of duty / tax payable to the government under the above acts.

The Electrical Inspector, assisted by the Electrical Duty Inspector who is observing the provisions under Maharashtra Electricity Duty Act 2016 and Maharashtra Tax on Sale of electricity Act – 1963 and rules made there under.

2. **Electricity Duty:**

As per the provisions under Maharashtra Electricity Duty Act 2016 rule No. 3(1), Electricity duty is charged on the consumption of electricity by various consumers. For charging electricity duty, consumer's classification as prescribed by Maharashtra Regulatory Authority on the basis of usage of electricity by the consumer. In this classification the different categories are: Residential, commercial, Industrial, Agriculture, Temporary, Advertisement/Hoardings, Mono/Metro Rail, Open access, Generator etc. The rates for these categories are different.

3. **Tax on Sale of electricity:**

As per the Maharashtra Tax on Sale of electricity Act 1963 Rule 3, Licensee charge tax on sale to consumers on basis of per unit consumption of electricity. Maharashtra State Electricity Distribution Company, Tata Power company, BEST, Reliance Infrastructure Company are the Licensee who pay / deposite tax on sale of electricity to Government of Maharashtra.

4. **Existing system for collection of Tax:**

As per provisions section – 6 of the Maharashtra Electricity Duty Act 2016, every Licensee shall collect and pay to the state Government the proper payable Electricity duty. As per provisions section – 4 of Maharashtra Tax on Sale of electricity Act – 1963 every Licensee shall collect and pay to the state Government the proper payable Electricity Tax on sale of

Electricity . The consumers/persons who generate electricity for their own purpose pay electricity duty to government of Maharashtra through GRAS online system.

**5. Exemption of Duty & Refund procedure:**

Subject to the conditions as it may impose, the state government exempt certain class of consumers in any part of state or under various policies from payment of Electricity Duty. The concerned consumers/persons may apply to the Electrical Inspector of the concerned district for sanction of electricity duty exemption in prescribed manner. The proposal of appropriate consumer if found suitable the Chief Electrical Inspector/Electrical Inspector as the case may be, approves the same and issue the eligibility certificate. The concerned consumers/persons submit the approval letter to the concerned office of the Licensee. The Licensee then stops charging & collecting electricity duty from next billing cycle.

In case of refund of electricity duty already paid, the concerned consumer/person may apply to the concerned office of the Licensee in prescribed manner. The Licensee may forward the said application after due scrutiny to the Electrical Inspector of concerned district for approval. The proposal of appropriate consumer if found suitable the Chief Electrical Inspector/Electrical Inspector as the case may be, approves the same and issue the eligibility certificate. After approval the amount of paid duty is refunded to the concerned consumer/person.

**6. Registration of Generating sets under Maharashtra Electricity Duty Rules, 1962:**

The generating sets above 200 kilowatt capacity are to be inspected by the Electrical Inspector under Regulation 34 of CEA Regulations 2023 and registered by the appropriate authority.